**कार्यालय**

**ग्राम पंचायत हळदगांव**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर**

**अंतर्गत विविध योजनेतील बांधकाम, पाणीपुरवठा, दिवाबत्ती**

**कामाकरिता लागणारे साहित्य**

**सूचना क्रमांक -०१**

**सन -२०२६-२७ (ई-निविदा) (पहिली वेळ)**

**ग्रा .पं.हळदगांव अंतर्गत बांधकाम, पाणीपुरवठा, दिवाबत्ती करिता लागणारे साहित्य खरेदी करण्याकरिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ईविविदा- प्रसिद्ध करण्यातयेत आहे.**

१) बांधकाम साहित्य –सामान्य फंड ,जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत बांधकामे, १५ वा वित्त आयोग अंतर्गत बांधकामे, अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास योजना, अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण योजना, जिल्हा परिषद शेष फंड, इतर योजनेतून लोक प्रतिनिधीने सुचविलेले बांधकामे व ग्रा .पं स्तरावरील सर्व प्रकारची बांधकामे व इतर कामा करिता लागणारे साहित्य.

२) ग्रा.पं. हळदगांव अंतर्गत पाणीपुरवठा व नळ योजनेची दुरुस्ती करणे व नवीन कामे करणे करिता लागणारे साहित्य.

३) ग्रा.पं. हळदगांव अंतर्गत दिवाबती करिता लागणारे साहित्य.

| अ.क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा कालावधी दिनांक व दरपत्रक स्वीकुतीचा अंतिम दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सन २०२६-२७ करिता ग्रामपंचायत हळदगांव अंतर्गत विविध योजनेतील बांधकाम, पाणीपुरवठा, दिवाबत्ती साहित्य खरेदी करण्याकरीता ई- निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहे. | दिनांक १८/०५/२०२६ ला दुपारी ०२.०० ते २६/०५/२०२६ ला दुपारी ०३.०० वा पर्यत उपलब्धराहील. | दिनांक २७/०५/२०२६ ला दुपारी ०३.०० वा. किंवा सोईनुसार उघडण्यात येईल. |

**-स्वा**

**सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्राम पंचायत हळदगांव**

**पंचायत समिती हिंगणा,**

**जिल्हा नागपूर**

**कार्यालय**

**ग्रामपंचायत हळदगांव**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर**

**अंतर्गत विविध योजनेतील बांधकाम,पाणीपुरवठा,दिवाबत्ती**

**कामाकरिता लागणारे साहित्य ई-निविदा**

**सन २०२६-२७ (पहिली वेळ)**

याद्वारे सर्व अधिकुत साहित्य पुरवठादारास सूचित करण्यात येते कि, **ग्रा.पं. हळदगांव** ला सन (२०२६-२७ ) मध्ये विविध कामाकरिता साहित्य आवश्यकते नुसार पुरवठा करण्यकरीता ई- निविदा ऑनलाईन करत आहे. http://www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर सादर कराव्यात. उशिरा आलेल्या .निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

सदर संपूर्ण निविदा प्रकिया ई-निविदा द्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकिय आज्ञावलीत होईल.सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना, शुद्धी पत्रके इत्यादींची माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**वरील कामाचे निविदा पत्रके http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर करून देण्यात आली आहे. सदर निविदा पत्रके अटी व शर्ती ई-संकेत दिनांक १८/०५/२०२६ ला दुपारी ०२.०० ते दिनांक २६/०५/२०२६ ला दुपारी ०३.०० वा. पर्यत अधिग्रहित (Download) करता येईल.**

**अटी व शर्ती**

- ग्रामपंचायतला उपलब्ध निधीनुसार कामाच्या प्रमाणात देयक देण्यात येईल त्याचप्रमाणे टी.डी.एस व इतर कपात शासनाच्या नियमानुसार देयकातून कपात केल्या जाईल .
- ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) शक्यतो दि **२७/०५/२०२६ ला दुपारी ०३.००** वा किंवा सोईनुसार नंतर http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ग्रामपंचायत कार्यालयात हळदगांव येथे उघडण्यात येईल.
- निविदा बाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना शुद्धी पत्रक अथवा इतर, माहितीhttp://www.mahatenders.gov.in या संकेत स्थाळावर उपलब्ध आहे.
- सदर कामाच्या ०३ योग्य ई-निविदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही-
- सदर ई-निविदा उघडण्या पासून दि:- ३१/०३/ २०२७ पर्यंत गृहीत राहतील.
- पुरवठाधारकातर्फे कोणत्याही शर्ती व अटी घालून सादर केलेली ईनिविदा- स्वीकारल्या जाणार नाही.
- ई-कोटेशन मंजूर झाल्यास रु. ५००/- च्या स्टँम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. (निविदा उघडल्या पासून ७ दिवसांचे आत. )

**१. ई- निविदा बांधकाम फी:-५,०००/- रु ( ना परतावा ) पाणीपुरवठा व दिवाबत्ती फी:-१,०००/- रु ( ना परतावा ) असून ग्रा.पं.हळदगांव यांच्या नावे राष्ट्रीयकृत बैकेचा ( धनाकर्ष ) डी.डी तयार करून दिनांक २६/०५/२०२६ ला दुपारी ०३.०० वाजे पर्यंत ग्रा.पं.हळदगांव ला सादर करून ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळून ) सदर ( धनाकर्षच्या ) डी.डी. च्या रक्कमेची सामान्य पावती ग्रामपंचायती कडून घेवून सदर पावती व धनाकर्ष स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा ई-कोटेशन रद्द करण्यात येईल. टीप:- ई-निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही .**

- तसेच बिल देते वेळी GST बिल घ्यावे लागेल.
- नमूद केलेल्या दरामध्ये कोणतीही प्रकारची सुधारणा करून मिळणार नाही. तसेच साहित्य पुरवठा करण्यास असमर्थ दर्शविल्यास सदर पुरवठाधारकास पुढील ५ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात यईल.
- ग्रामपंचायततिच्या मागणीप्रमाणे साहित्य जागेवर पोहचता करावी लागेल तसेच साहित्य चांगल्या प्रतीने व प्रमाणबद्ध पुरवठा करणे बंधनकारक राहील .
- निविदा धारकांना कोणतीही पूर्वसूचना /कारण न दर्शविता २ अथवा सर्व निविदा मंजूर /नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
- मंजूर निविदा धारकाने वेळेवर व मुदतीत चांगल्या प्रतीचे प्रमाणबद्ध साहित्य पुरवठा करण्यास चालढाल/टाळाटाळ केली तर मंजूर दरानुसार निविदाधारक क्र.२ किवा इतर कोणत्याही साहित्य खरेदी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
- बांधकाम / पाणीपुरवठा / दिवाबत्ती कंत्राटदराने ऑनलाईन अपलोड करावयाची कागदपत्रे:
- पॅन कार्ड
- जि.एस.टी. प्रमाणपत्र
- इन्कमटॅक्स रिटर्न मागील ३ वर्षाचे
- पुरवठा धारकाचे आधार कार्ड
- एम.एस.एम.ई. सर्टिफिकेट
- फर्म / व्यवसाय / कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र. ( बांधकाम निविदा करीता )
- जि.एस.टी. रिटर्न
- टर्न ओव्हर सर्टिफिकेट ( बांधकाम निविदा करीता )
- निविदा फी चा डी.डी. ( धनाकर्ष ) व त्या नुसार ग्रामपंचायती कडून घेतलेली सामान्य पावती.

- निविदे मधील दर पत्रका मध्ये साहित्या चे दर व त्या साहित्या वर लागणारे GST कराचे दर हे वेगवेगळे दर्शवण्यात यावे अन्यता दर पत्रिका ग्राह्य मानल्या जाणार नही तसेच निविदा मंजूर झाल्या नंतर त्याच पद्धतीने बिल सादर करावे लागेल.
- दर पत्रीकेत दर्शवलेले दर चालू बाजार भावाचा आधारित असावे तसेच दर चालू बाजार भावाला आधारित नसल्याची खात्री पटल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्राम पंचायत ला राहील.
- बांधकाम साहित्या ची royalty ची रक्म पूरवठा धारकाने स्वता भरावी लागेल royalty भरल्याची पावती बिला सोबत सादर करावी .

- निविदा धारकांना कोणतीही पूर्व सूचना / कारण दर्शविता १ अथवा सर्व निविदा मंजूर / नामंजूर करण्याचा अधिकार ग्राम पंचायत ला राहील.
- एल-१ मध्ये येणाऱ्या साहित्य पुरवठा धारकाची संपूर्ण निविदा मंजूर करता येणार नाही तर ज्याचे दर ज्या ज्या बाबीमध्ये कमी असेल त्यांचे त्या- त्या साहित्याचे दर मंजूर करण्यातयेईल व त्या त्या कमी रकमेच्या निविदा धारकास साहित्य पुरवठा करण्या करिता साहित्य मंजुरीचा आदेश देण्यात येईल. ज्यावेळी साहित्याची आवशकता भासेल त्या वेळी साहित्य मांगविण्याचा आदेश देण्यात येईल. साहित्याची निविदा मंजूर झाली म्हणून एखादे काम करतांना ते काम पूर्ण साहित्य सह पुरवठा धारकासमंजूर झाले असा गैर समज करून घेऊ नये तर फक्त साहित्याची निविदा मंजूर झाली असे गृहीत धरावे.
- पुरवठा धारकास जे जे साहित्य मंजूर होईल त्या त्या साहित्याचा मंजूर झाल्याचा आदेश देण्यात येईल सदर साहित्य पुरवठा धारकांना साहित्य पुरवायचे मान्य असेल किवा अमान्य असेल तसे साहित्य मंजुरीचा आदेश दिला पासून सात दिवसाचे आत ग्रा.पं लेखी स्वरुपात कळवावे मुदतीत न काळविल्यास साहित्य पुरवठा करावयाचा नाही असे समजून आपणास न विचारता निविदा रद्द करून दुसऱ्या क्रमांकाचा साहित्य निविदा धारकास आदेश देण्यात येईल यात आपला कोणताही उजर ऐकूण घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**-स्वा-**

**सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्राम पंचायत हळदगांव**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर**

Signature Not Verified

Digitally signed by ANITA PRAKASH DHAGE
Date: 2026.05.18 12:52:55 IST
Location: Maharashtra-MH